१४ २८७५५६०

जा.क्र. माध्य.३( )/प्रथम मान्यता/पुवि/२००१
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक : 19 DEC 2001

शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

विषय : प्रथम मान्यता. . .
शाळा समर्थ विद्यामंदीर, तावरे कॉलनी

संदर्भ : आपले पत्र क्रमांक : शिक्षण/ माध्य/ह-४/प्रमा/२०००-२००१, दि. १२. ९. २००१

वरील संदर्भिय पत्रान्वये कळविण्यांत येते की, माध्यमिक शाळा संहिता नियम ३.१, ३.२ व ३.३ अन्वये समर्थ विद्या प्रसारक मंडळी, तावरे कॉलनी, पुणे-९. संस्थेच्या समर्थ विद्यामंदिर तावरे कॉलनी, पुणे-९. माध्यमिक शाळेच्या इयत्ता ८ वी/xxxxxxxxx वी च्या वर्गास २०००-२००१ या शेक्षणिक वर्षासाठी जून २००० पासून प्रथम मान्यता देण्यात येत आहे. सदर मान्यता खालील अटोंची पूर्तता अधिन राहून देण्यांत येत आहे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी खालील अटोंची पूर्तता शाळा करित आहे किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या येळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पूर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याची तपासणी करुन पुढील मान्यतेच्या येळी प्रस्ताव पाठवितांना खालील अटो पुर्ण केलेल्या आहेत किंवा कसे याबाबतही अहवाल प्रस्ताव सोबत पाठविण्यांत यावा.

१. संस्थेने स्वतःच्या मालकीची शैक्षणिकदृष्ट्या योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन घ्यावी.
२. मुख्याध्यापक पदी पात्र व अनुभवी व्यक्तीची नेमणूक करावी.
३. स्वतंत्र व विषयवार प्रयोगशाळा सर्व साहित्यानिशी उपलब्ध करुन घ्यावी.
४. स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन दरवर्षी अधिक ग्रंथांची भर घालावी.
५. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर व शेक्षणिक साहित्य उपलब्ध करुन घ्यावे.
६. पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग उपलब्ध करुन घ्यावा.
७. स्वतंत्र स्वच्छतागृहाची सोय उपलब्ध करुन घ्यावी.
८. वाढीव फी चे दर मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून मंजूर करुन घ्यावेत.
९. शालेय रेकॉर्ड माध्यमिक शाळा संहिता नियमाप्रमाणे ठेवून त्यात अद्ययावत नोंदी घेण्यात याव्यात.
१०. कर्मचा-यांना सरकारी वेतनश्रेणी नुसार वेतन अदा करावे.
११. शिक्षकांची भविष्य निर्वाह निधी खाती उघडावीत.
१२. विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करावी.
१३. तपासणी अहवालातील सुचनांची पूर्तता करावी.
१४. पालक शिक्षक संघांची स्थापना करावी.
१५. संगणक सुविधा उपलब्ध करावी.

मूळ प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत: समर्थ विद्यामंदिर तावरे कॉलनी, पुणे-९.

"यशवंतराव चव्हाण भवन"
जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/प्र.मा./९वी/०१-०२
पुणे, दि. २५/७/२००२

प्रति,

सचिव,

समर्थ विद्या प्रसारक मंडळ सावरे कॉलनी
पुणे ९

विषय :- इ. ९ वी च्या वर्गास प्रथम मान्यता देणेबाबत. ०१-०२

उपरोक्त विषयानुसार कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या समर्थ विद्या मंदिर माध्य. शाळा, पुणे ९ या माध्यमिक विद्यालयातील इ. ८वी च्या वर्गास मा. शि. उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचेकडील आदेश क्र. माध्य-३[१४]/नमाशा/मान्यता/पुणे/५०४/२००० दि. २२/४/०१ अन्वये परवानगी देणेत आलेली आहे. माध्यमिक शाळा संहिता नियम क्रमांक ५.२ नुसार उपरोक्त शाळेत जून १९९ पासून इ. ९ वीच्या वर्गास विना अनुदान तत्वावर खालील अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देणेत येत आहे.

१] शाळेसाठी स्वतंत्र प्रयोगशाळा क्रीडांगण असावे.
२] ग्रंथालय व ग्रंथ उपलब्ध करणेत यावेत.
३] पुरेसे विज्ञान साहित्य असावे.
४] बी.एस्सी. बी.एड शिक्षकांची नियुक्ती करणेत यावी.
५] विद्यार्थ्यांचा विविध परीक्षा स्पर्धा यात सहभाग
६] असावा.

मा. शि.अ. यांची
मान्य टिपणी

शिक्षणाधिकारी [माध्य]
जिल्हा परिषद पुणे

प्रत,

१. मुख्याध्यापक,

समर्थ विद्या मंदिर माध्य. शाळा,
पुणे ९.

TRUE COPY

मुख्याध्यापिका/मुख्याध्यापक
समर्थ विद्या मंदिर माध्यमिक शाळा

(९६)

जिल्हा परिषद पुणे.
शिक्षण विभाग [माध्यमिक]
जा.क्र.शिक्षण/माध्य/ह-४/नै.वा./०२-०३
पुणे दि. ७/६/२००२

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका, माध्य. शाळा
समर्थ विद्या मंदिर / तावरे कॉलनी.
पुणे

विषय :- नैसर्गिक वाढीने परवानगी देणेबाबत. ०२-०३
~~इ.६ वी, इ. ७ वी~~, इ. ९ वी, इ. १० वी.

आपल्या समर्थ विद्या प्रसारक मंडळ, पुणे या शैक्षणिक संस्थेव्दारा संचलित समर्थ विद्या मंदिर माध्य. शाळा / तावरे कॉलनी माध्यमिक विद्यालयास इ. ८ वी ~~/इ. ५ वी~~ या वर्ग सुरु करणेस सन २००० - २००१ या शैक्षणिक वर्षापासून मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचेकडील आदेश क्र. माध्य/३[१४]/नमाशा/मान्यता/पुवि/५०८/२००१, दि. २२/८/०१ अन्वये शासनाची परवानगी मिळालेली आहे. सन २००१-०२ या शै. वर्षापासून इ. ९ वीच्या वर्गास व ~~सन २०० - २०० या शैक्षणिक वर्षापासून~~ आपल्या माध्यमिक शाळेत ~~इ. ६ वी, इ. ७ वी~~, इ. ९ वी, इ. १० वी या वर्ग नैसर्गिक वाढीने सुरु होत आहे. सदर वर्गास जून २००२ पासून नैसर्गिक वाढीने परवानगी देणेत येत आहे. तरी आपण सदर वर्गाची वार्षिक तपासणी करुन घेणेसाठी संबंधित उपशिक्षणाधिकारी, जि.प. पुणे / ~~गट शिक्षणाधिकारी, पं.स.~~ यांचेशी संपर्क साधावा. तसेच शाळेची वेळेत तपासणी करुन घेवून तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयाकडे सादर करणेत यावा.

ज्या माध्यमिक शाळांमध्ये नैसर्गिक वाढीने इ. १० वीचा वर्ग सुरु होत आहे अशा सर्व माध्यमिक शाळांनी मा. विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे १० यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याबाबत आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची यादी सोबत देणेत येत आहे. त्याप्रमाणे कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी अन्यथा शाळेस संकेतांक न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार रहाणार नाही याची नोंद घेणेत यावी. [ मागील बाजूस कागदपत्रांची यादी आहे. ]

**TRUE COPY**

J.N.H...
शिक्षणाधिकारी[माध्यमिक]
जिल्हा परिषद पुणे. करिता.

3

सांकेतिक क्रमांकासाठी प्रस्तावासोबत जोडावयाच्या प्रमाणपत्रांची यादी.

१. मुखपृष्ठ पत्र.

~~२. विहित नमुन्यातील शिफारस प्रपत्र [इंग्रजी व मराठी]~~

३. उपलेखा कार्यालयाने दिलेल्या शाळा परवानगी पत्राची प्रत.

४. त्या कार्यालयाने दिलेल्या प्रथम मान्यता पत्राची प्रत.

५. इ. ९ वी, इ. १० वी नैसर्गिक वाढीने परवानगी पत्र.

~~६. शाळा वार्षिक तपासणी अहवाल.~~

७. संस्थेची घटना. [झेरॉक्स प्रत साक्षांकित केलेली.]

८. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी. मा. धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली.

९. इ. १० वी तील विद्यार्थ्यांची यादी.

१०. शासन निर्णय व खात्याचे नियम काटेकोरपणे पालन करणेबाबत संस्थेचे रु. २०/- च्या स्टॅम्प पेपरवर संस्थाप्रमुखाचे हमीपत्र.

११. संस्थेविरुध्द गैरव्यवहाराबाबत अथवा न्यायालयात प्रकरण नसलेबाबत संस्था प्रमुखाचे हमीपत्र व त्यावर संबंधित तपासणी अधिकारी यांची स्वाक्षरी.

सदर कागदपत्रे दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावी व एक प्रत विभागीय शिक्षण मंडळाकडे सादर करावी.

---

मुख्याध्यापिका/मुख्याध्यापक
समर्थ विद्या मंदिर माध्यमिक शाळा
पुणे-९